KavitaSagar Publishing Agency
9975873569, 8484986064

ISBN **978-81-949968-4-2**

मराठी कवितासंग्रह

तूही घे एक उंच भरारी

अभय प्रेमसागर अल्लाडा

An Imprint of Kavita Sagar

कविता सागर, जयसिंगपूर

02322 - 225500, 9975873569, 8484986064

Kavita Sagar कविता सागर
(KavitaSagar Direct Publishing) KDP
An Imprint of Kavita Sagar

- **I**nternational **S**tandard **B**ook **N**umber: **978-81-949968-4-2**
- Title - **Tuhi Ghe Ek Unch Bharari तूही घे एक उंच भरारी (मराठी कवितासंग्रह)**
- Edition - **First**
- Volume - **One**
- Price - **Rs. 350/-**
- Pages - **104 + 08 = 112** (Including Covers)
- Language - **Marathi**

ISBN 978-81-949968-4-2
9 788194 996842

- Poet - **Abhay Premsagar Allada अभय प्रेमसागर अल्लाडा**
  अंम्बेकर लेआउट, झोन २, वरोरा - ४४२९०७, जि. चंद्रपूर, Phone - 9881945138

- Subject - **Collection of Marathi Poems**
- Year of Publication / Date of Issue - **07 June 2025**
- Book Version - **Paperback / Softback**

- Copyright **Text** © **Abhay Premsagar Allada** (Poet)
- Copyright **2025** © **Dr. Sunil Dada Patil** (Printer and Publisher)

- Published in India by - **Dr. Sunil Dada Patil**
  Publisher Agency - **Kavita Sagar**
  Imprint - **Kavita Sagar, Jaysingpur**
  Post Box Number - 69, Jaysingpur - 416101,
  Taluka - Shirol, District - **Kolhapur**, Maharashtra, **India**
  02322 - 225500, 9975873569, sunildadapatil@gmail.com

- Printed in India by - **Dr. Sunil Dada Patil**
  On behalf of the **KavitaSagar Printing Services**

Views expressed in this book are **entirely** of the respective **Author** and do not represent the opinions or thoughts of the **Publisher.**

TABLE OF CONTENTS अनुक्रमणिका

प्रस्तावना..12

01. जीवन सुंदर आहे..16

02. खग..17

03. काजवा..19

04. पक्षीण..21

05. श्वास घेऊ तरी कसा?..22

06. गाठू शिखर यशाचे..24

07. गाऊ वृक्षारोपणाचे पोवाडे..25

08. वृक्ष गुलमोहरचा..26

09. माय मराठी...28

10. ओळखशील कसा आजच्या निसर्गाला? 30

11. पीक कपाशीच..31

12. धर कास तू शिक्षणाची..32

13. फुलल्या कळ्या...33

14. घडी..34

15. तूचं हो तुझा शिल्पकार..35

16. तूही घे एक उंच भरारी..36

17. थेंब पाण्याचा 37

18. मनुजा 39

19. मला किती छान वाटत आहे 40

20. क्षितिजापर्यंत जायचे आहे 42

21. गोगलगाय 43

22. छकुली 44

23. शिवार 46

24. बाभूळ 47

25. झरा 48

26. वेड्या मना 50

27. सरिता 51

28. माझी शाळा 53

29. अशी हाय माही माय 55

30. ये तू परतूनी घरा 56

31. शब्दांची किमया 57

32. गाऊ आम्ही जयगीत 58

33. माझा बाप 59

34. भूगर्भातलं केशर 60

35. सुस्वागतम 61

36. पाणी 62

37. माझी सावली 64

38. कविता 66

39. असं होत बालपण 67

40. जीवन 68

41. फुलपाखरू 69

42. जीभ 71

43. कवी 73

44. मला येत नाही 74

45. मृगसरी 75

46. पारवा 76

47. पुन्हा एकदा 77

48. मैत्री 78

49. एवढं मलाही कळतं 79

50. पाण्यासाठी 80

51. हिवाळा 81

52. बगळ्या - बगळ्या दूध दे 82

53. लालपरी 83

54. मुसाफिरा 85

55. झेंडूची फुले 86
56. वृक्षाची मुलाखत....................87
57. बी....................88
58. हिरवी पानं 89
59. आजोबा न्या मला बागेत....................90
60. येवो लाख अडथळे....................91
61. कोरोना 92
62. गुलाब....................93
63. मोरा रे मोरा....................95
64. भिंगोटा 96
65. सायकल....................97
66. तिखट पापड....................98
67. बगळा....................99
68. ये - ये चिऊ माझ्या घरात....................100
69. चला मैदानी खेळ खेळू 101
70. मित्र....................102
71. नदी गं नदी 103

तूही घे एक उंच भरारी (मराठी कवितासंग्रह)

॥ अर्पण पत्रिका ॥

‘तूही घे एक उंच भरारी’
हे काव्यपुष्प अर्पितो
तुज आई....

सुशीलाबाई प्रेमसागर अल्लाडा
जन्म 12/10/1940
मृत्यू 28/04/2005

चंदनापरी तू झिजलीस आई
शिक्षणात तू पुरविलीस शाई
काव्यपुष्प अर्पितो तुज आई
हर काव्यपाकळी तुझी आई

अभय प्रेमसागर अल्लाडा

मनोगत

आज माझा दुसरा कवितासंग्रह आपल्या हाती देताना मला अत्याधिक आनंद होत आहे. हा कवितासंग्रह पूर्ण करण्यासाठी परमेश्वराने त्याची कृपा पुरवली त्यामुळे मी परमेश्वराने आभार मानतो.

'तूही घे एक उंच भरारी' हा मराठी कवितासंग्रह वाचकांच्या हाती देण्याचा विचार बऱ्याच वर्षापासून माझ्या मनात घोळत होता. यामधील बहुतांश कविता या निसर्ग संवर्धनाशी निगडित आहे. अगदी लहानपणापासूनच मला निसर्गाप्रती विलक्षण प्रेम वाटू लागलं झाडं, फुलं, पानं, पशु पक्षी यांना जवळून पाहण्यात मला आनंद वाटत असे. हळूहळू मनाला असे वाटू लागले की, यांनाही आपल्यासारखे जर बोलता आले असते तर त्यांनी आपल्या संवेदना, भावना आणि आनंद कशाप्रकारे आपल्या संगती वाटल्या असत्या आणि त्यातूनच पुढे माझे काव्य फुलू लागलं. मानवी जीवन आणि निसर्ग यांचा मेळ काव्यातून घालण्याचा प्रयत्न मी करू लागलो.

वास्तविक आपण या जगाचे मालक नसून परमेश्वराचे कारभारी आहोत. या निसर्गाची देखभाल करणे ही आपली मूलभूत जबाबदारी आहे. हा विचार खोलवर रुजविण्याचा प्रयत्न मी करू लागलो. जेव्हा मी निसर्गाला जवळून पाहू लागलो तेव्हा कळले की, निसर्ग आमच्याशी केवळ बोलतच नाही तर आम्हाला शिकवतो देखील. निसर्ग हा एक उत्तम शिक्षक असल्याचं मला कळून आलं.

मानवी जीवन म्हटलं की सुख आणि दुःख हे नाण्याच्या जणू दोन बाजू आहेत तसेच जीवन प्रवाहात सुख दुःख हे ऊन सावली प्रमाणे असतात. माणूस कधी आनंदाने भारावून जातो तर कधी दुःखाने कोलमडून जातो. पण दोन्ही बाबी जीवनाचाच भाग आहेत; हे निसर्ग आम्हाला समजावून सांगतो. केवळ मानवी वाट्यालाचं सुख दुःख आहेत असे नाही तर निसर्गातील पशु पक्षी हेदेखील त्यातून जात असतात मात्र ते लवकरच आपल्या दुःखाला विसरून नव्या जोमाने जीवनाची सुरुवात करीत असतात.

उदाहरणार्थ - वादळ वाऱ्यानं पक्षांची घरटी उध्वस्त झाली म्हणून ते पुन्हा घरटे बांधणे सोडत नाही आणि दुःखाचे रडगाणे गात न बसता जीवनाची सुरवात नव्याने करीत असतात. हीच शिकण्याजोगी बाब अंगीकृत करण्याचा प्रयत्न यातून केला आहे. त्याचप्रमाणे जीवनाला सुसंस्कृत आणि सुस्वरूप करण्याचे काम शिक्षणाद्वारे साध्य होते म्हणून विद्यार्थ्यांना हा कवितासंग्रह शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारा आणि निसर्गाप्रती संवेदनशील करणारा ठरणार आहे.

'तूही घे एक उंच भरारी' यातील कविता जीवनाला प्रेरणा देणाऱ्या आहेत. हा कवितासंग्रह केवळ विशिष्ट वयोगटासाठी नाही तर जीवनातील प्रत्येक टप्प्यावर जगणाऱ्या व्यक्तींसाठी लाभदायक आहे. जीवनातील उदात्त ध्येय गाठण्यासाठी बिकट परिस्थितीतदेखील आशेची ज्योत तेवत ठेवण्याचा संदेश हा कवितासंग्रह

देतो. **'तूही घे एक उंच भरारी'** ही केवळ एक कलाकृती नसून जीवन प्रेरणा देणारे काव्य आहे.

हे माझ्या एकट्याच्या श्रमाचे फळ नसून हे अनेकांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि आवश्यक सुधारणेमुळे हे शक्य झाले आहे.

माझी पत्नी भारती हिचे या कार्यात मला भरपूर सहकार्य मिळाले तसेच कवीवर्य पौलस वाघमारे, अशोक तुरक्याल, अनिल तांबे, बाळासाहेब पठारे आणि वैभव मून यांचे मार्गदर्शन लाभले; तसेच माझे सर्व इष्टमित्र यांनी माझ्या काव्याला दिलेली कौतुकाची थाप हीच माझी खरी प्रेरणा आहे.

'तूही घे एक उंच भरारी' हा कवितासंग्रह वाचकांच्या हाती देण्यासाठी कवितासागरचे संपादक डॉ. सुनील दादा पाटील आणि त्यांचे सहकर्मी यांच्या प्रयत्नामुळे हे शक्य होऊ शकले या सर्वांचा मी आभारी आहे.

'तूही घे एक उंच भरारी' हा कवितासंग्रह माझी आई **सुशीला प्रेमसागर अल्लाडा** हिस समर्पित करून आपल्या हाती देत आहे.

'तूही घे एक उंच भरारी' हा कवितासंग्रह आपल्याला निश्चितच एक नवा दृष्टिकोन देईल अशी मी खात्री बाळगतो.

- अभय प्रेमसागर अल्लाडा
9881945138
abhayallada@gmail.com

प्रस्तावना

'तूही घे एक उंच भरारी'

नवनिर्मिती हा मनुष्याला प्राप्त झालेला सर्वात मोठा ठेवा आहे. सर्जनशीलता आम्ही जिवंत असल्याचं द्योतक आहे. शब्दांचा धनी तसा निर्मिक आहे परंतु तो निर्मिक आम्हाला लेखणीचे दान देतो. तो आम्हाला शब्द देतो, कल्पकता देतो आणि भावना देतो ही त्या शब्दप्रभूची महानता आहे.

'तूही घे एक उंच भरारी' या कवितासंग्रहाचे कवी अभय अल्लाडा ह्यांचा माझा परिचय अगदी शाळेपासून आहे. कवी मन, मृदू भाषी, समाजसेवेप्रती तळमळ आणि बाल मन अशी त्यांची एकंदर ओळख आहे. बाल साहित्याची निर्मिती करणं ही काळाची गरज आहे. निसर्ग, मराठी भाषा, तळागाळातील लोकांचा जगण्यासाठी चाललेला संघर्ष आणि दैनंदिन जीवनातील आमचे नाते संबंध ह्यावर त्यांची कविता भाष्य करते. त्याच्या सहज आणि सोप्या कवितेमध्ये संदेश आहे आणि अगदी लहानग्यांपासून तर थोरांपर्यंत पोहचण्याची ताकद आहे. व्यस्त आणि धकाधकीच्या जीवनामध्ये असल्या कविता स्फुरणं ही देवदत्त देणगी म्हणावी लागेल.

आम्ही कितीदा सहज बोलून जातो कि आमचे ते जुने दिवस आता पुन्हा वापस येणार नाहीत.' तो जुना काळ वेगळा होता, तो जुना काळ साधा, जिव्हाळयाचा,

स्थिर आणि सवड असलेला होता. हल्ली आमची भटकंती थांबता थांबत नाही, अतिव्यस्तता आणि नात्यांमध्ये आलेली कृत्रिमता ह्या सर्वांमुळे आमचे जीवन वेगळ्याच वळणावर येऊन ठेपलेले आहे असे आम्ही पाहतो. कवी अभय ह्यांच्या कविता वाचल्या कि परत त्या जुन्या काळात गेल्याचा अनुभव आपल्याला होतो. पुन्हा ते गेलेले दिवस परत आल्याचा भास होतो आणि बालपणाच्या आठवणीत आम्ही रमून जातो.

त्यांची एक 'पारवा' नावाची कविता प्रत्येकाला अंतर्मुख करणारी आहे.

एक पारवा झेलतो कहर उन्हाचा
तरी सोडत नाही छंद उडण्याचा

उडतो आकाशी अन् ठेवतो नजर खाली,
कुणी बरे त्याला ही माणुसकी शिकवली?

उन्हातही उडतो कसा उंच - उंच आकाशी,
तरी नाही तोडली नाळ आपल्या मातीशी.

काव्य हा नुसता विरंगुळा नाही तर त्यातून प्रबोधन होऊ शकतं हा विचार हा कवितासंग्रह वाचल्यावर प्रबळ होत जातो. आमची मायबोली किती सुंदर आहे. तरुण पिढीने ती बोलावी, त्यामध्ये उत्कृष्ट अशी साहित्य निर्मिती व्हावी हे साहित्य आमच्या मायबोलीचं साहित्य म्हणून आम्ही त्याचा प्रचार प्रसार करावा हे अगत्याचे आहे. प्रत्येक पिढीत मराठी

भाषेमध्ये साहित्य निर्माण होणे आवश्यक आहे. तिचा गोडवा आमच्यासोबत येणाऱ्या पिढ्यांनी चाखणं अपेक्षित आहे.

त्यांची खालील कविता पर्यावरणाचा संदेश देते. पर्यावरण आणि आमची जबाबदारी हा धागा कवितेमधून साधणं खूप महत्त्वाचं आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होताना त्यावर बोलण्याचे काम नुसतं सामाजिक संस्थांचे नसून कवींचे आणि लेखकांचे आहे किंबहुना आम्हा सर्वांचे आहे. तेजीने होत असलेले शहरीकरण, रस्ते विकास तसेच इतर पायाभूत सुविधांचा विकास ह्यामध्ये पर्यावरणाचे होत असलेले नुकसान या बाबतीत आधुनिक साहित्यिकांनी भाष्य करणे महत्त्वाचे आहे.

जीव धोक्यात घालून हरणी पिते घोटभर पाणी,
आणि तू रे मनुजा का उगीच वाया घालतो पाणी.

ही कविता आम्हाला जलमित्र बनण्याची प्रेरणा देते.

त्यांची लालपरी नावाची कविता तर सर्वसामान्यांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाची लाल बस ह्यांच्याशी जुळली असलेली नाळ ह्याचं वर्णन करणारी आहे. परिवहन मंडळाची बस ही सर्वसामान्यांच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. अशा विषयावर काव्य हा विचार दुर्मिळच.

गरूड पक्षी एकमेव पक्षी आहे जो वादळ आल्यावर लपून न बसता तो त्यावर स्वार होतो आणि

उंच भरारी घेतो. जीवनात वादळं येतात परंतु त्या वादळांनी आम्ही जीवनात माघार घेऊ नये तर वादळांवर स्वार होऊन उंच भरारी घेण्याची क्षमता निर्माण करावी हे कवीला अभिप्रेत आहे. नवं साहित्य आम्हाला नवीन उमेद देते. ह्या कविता संग्रहाला मराठी साहित्यात पडलेली अर्थपूर्ण भर एवढ्यावर मर्यादित करणं योग्य होणार नाही. हा कविता संग्रह उंच भरारी घ्यायला नवे पंख देणारा आहे. कवी अभय हे स्वतः खडतर असे जीवन जगत इथपर्यंत पोहचलेले आहेत परंतु कविता लेखन विश्वात ते समृद्ध आहेत आणि किती आणि काय म्हणजे पुरेसं हे कळल्यावर माणूस कसा समाधानी होतो हे त्यांच्या कवितेतून शिकायला मिळतं.

त्यांच्या काव्यसंग्रहाबद्दल त्यांचे मनस्वी अभिनंदन करतो, त्यांचा काव्य संग्रह सर्वदूर जावो आणि त्यांना चांगला वाचकवर्ग लाभो. त्यांच्या पुढच्या साहित्य निर्मितीसाठी शुभेच्छा आणि प्रार्थना.

- वैभव मून (नागपूर)
संस्थापक
उद्धार

01. जीवन सुंदर आहे

जीवन सुंदर आहे कला जगण्याची हवी
पंख जरी नसले तरी हौस उडण्याची हवी

जरी असेल जीवन तुफानांनी घेरलेले
तरी हौस तुफानांशी झुंजण्याची हवी

जरी ठेचा लागल्या पाया हजार वेळा
तरी हिम्मत पुन्हा चालण्याची हवी

ढग निराशाचे जमूद्या कितीही नभी
इच्छा अंधारातही चालण्याची हवी

उसळू द्या कितीही सागराच्या लाटा
हौस आशेची नौका हाकारण्याची हवी

जरी वाटा जीवनाच्या वाकड्या तिकड्या
तरी हौस त्या वाटेवर झिजण्याची हवी



02. खग

एक खग बोले मज
तूही उड रे नभात
गीत नवे गात - गात
पहा सुंदर प्रभात ।।१।।

जरी पंख इवलुशे
तरी उडतो आकाशी
पावसात भिजूनही
ऊब नको चुलीपाशी ।।२।।

कधी नभ दिसे निळे
तर कधी ढग काळे
कधी सुटे गार वारा
कधी अंधाराचे जाळे ।।३।।

लपतो बहुदा रवि
काळ्या - काळ्या ढगामागे
ना कोणी मागे ना पुढे
मी एकला ढगामागे ।।४।।

कधी - कधी एकटाच
उडतो मी या नभात
विजांच्या कडकडाटात
ढग गडगडाटात ।।५।।

पंख नव्हे माझी शक्ती
शक्ती माझ्या विचारात
तूही घे उंच भरारी
आज निळ्या आकाशात ।।६।।

03. काजवा

कसा दिसतो काजवा
पहा तिमिरात जरा
लुकलुकतो भूवर
जैसा नभातला तारा ।।१।।

जीव त्याचा इवलुसा
तरी चमकतो कसा?
पहा तो या अंधारात
जणू रवि लहानसा ।।२।।

जेव्हा लपून बसतो
शशी काळ्या ढगामागे
तेव्हा असतो काजवा
रात्री मुसाफिरासंगे ।।३।।

म्हणतो मुसाफिराला
रात्र जरी काळोखाची
तरी भीती नको मनी
साथ तुला काजव्याची ।।४।।

धर तू वाट पुढची
बघ माझ्या तेजाकडे
तेज उधारीचे नव्हे
मुसाफिरा माझ्याकडे ।।५।।

पहा येथे तोचि खरा
ज्याच्यापाशी स्वबळ रे
बन तूही माझ्यापरि
आळवितो मी तुला रे ।।६।।



04. पक्षीण

आज आनंदाने गाते धरा
विसरूनी ग्रीष्म ऋतू सारा
पाहते बरसणाऱ्या जलधारा
नि खेळणारा गार - गार वारा ।।१।।

आज तीही पक्षीण आनंदाने गाते
जिच नुकसान झालं होतं भारी
तिची दोन पिल्लं उन्हानं मेली
आज विसरून व्यथा सारी
तिनेही घेतली नभात भरारी ।।२।।

तो वृक्षही आज गोड हसतो
ज्याची पानं होती गळाली
तोही विसरून आठवण सगळी
पाहतो कोवळी सुंदर डहाळी ।।३।।

पहा त्या फुलपाखराकडे जरा
त्यानेही सोसला होता उन्हाचा वारा
समजुनी हा खेळ नियतीचा सारा
विसरूनी तो कालच्या दुःखाला
आज बागडतो पाहुनी जलधारा ।।४।।

05. श्वास घेऊ तरी कसा?

जीव गुदमरतो हा
काळया - काळया धूरामध्ये
श्वास घेऊ तरी कसा?
भुरक्या शहरामध्ये? ।।१।।

जरी दिपतात नेत्र
पाहुनिया रोषणाई
श्वास घेऊ तरी कसा?
येथे गार वारा नाई ।।२।।

कैसे वाढत चालले
प्रदूषण सारीकडे
श्वास घेऊ तरी कसा?
तोडली हिरवी झाडे ।।३।।

दिसतात कारखाने
मज जिकडे तिकडे
श्वास घेऊ तरी कसा?
काळा धूर चोहीकडे ।।४।।

जीव झाला कासावीस
विनादोरी लागे फास
श्वास घेऊ तरी कसा?
मज ना सोसे हा त्रास ।।५।।

लावा वृक्ष आतातरी
करा रे हिरवे रान
जोडा वृक्षासंगे नाते
होईल सुखी हा प्राण ।।६।।

06. गाठू शिखर यशाचे

गाठू शिखर यशाचे
टाकू पाऊल पुढचे
बांधू एक स्वप्न तारू
आम्ही ध्येयाचे - ध्येयाचे ।।१।।

करू वेळ नियोजन
नको मुखी शब्द पण
घेतला आता हा प्रण
ध्येयासाठी हर क्षण ।।२।।

जाऊ आता पुढे - पुढे
येवो कितीही संकटे
अशक्य मागे फिरणे
जरी पाया टोचे काटे ।।३।।

मार्ग जरी खडतर
तरी कोण आम्हा रोके
ठाम निर्धार आमुचा
यशाचेचं बांधू झोके ।।४।।

चढू यशाच्या शिखरा
नभा करून अंकित
रोवू विजयी पताका
गाऊ आम्ही जयगीत ।।५।।

07. गाऊ वृक्षारोपणाचे पोवाडे

चला गाऊ वृक्षारोपणाचे पोवाडे
आज अंगणी लावू दोन तरी झाडे ।।धृ।।

त्या झाडाभोवती करू गोल आळे
इवलूशा रोपट्यास वाढवू लडिवाळे
करुनी कुंपण जपू जिवा पलीकडे
आज अंगणी लावू दोन तरी झाडे ।।१।।

गार - गार पाण्याने न्हाऊ घालू त्यासी
होता वृक्ष बांधू झोके श्रावणमासी
उधळू रंग इंद्रधनूचे चोहीकडे
आज अंगणी लावू दोन तरी झाडे ।।२।।

येतील अंगणी पक्षी टिपण्या दाणे
बसूनी फांदीवर गातील गाणे
मग होईल आनंद जिकडे तिकडे
आज अंगणी लावू दोन तरी झाडे ।।३।।

08. वृक्ष गुलमोहरचा

वृक्ष गुलमोहरचा
पहा कसा बहरला
फुलं लागलीत लाल
हरएक डहाळीला ।।१।।

पानं गुलमोहराची
दिसती हिरवीगार
बहु सुंदर - सुंदर
जसं सुपीक वावर ।।२।।

सूर्य ओकी जरी आग
तरी गुलमोहराचा
वृक्ष करी स्मित हास्य
भाव हाची गोड त्याचा ।।३।।

शशी प्रकाशात दिसे
जैसा की मंगळतारा
भान जाई हरपूनी
दिसे सुंदर नजारा ।।४।।

शेंगा हिरव्या - हिरव्या
डोलतात वाऱ्यावर
जशी पोरं ती उनाड
झुलतात झोक्यावर ।।५।।

गुलमोहराच्यापरि
तूही तापून उन्हात
दे स्मित हास्य जगास
दुःख ठेवूनी मनात ।।६।।



09. माय मराठी

माय माझी मराठी
मी सूत मराठीचा
अभिमानाने गातो
पोवाडा मराठीचा ।।१।।

अमृताहूनी गोड
माय माझी मराठी
साधु संतास वाटे
गोड इथली माटी ।।२।।

ज्ञानोबाने रोविला
पाया हा मराठीचा
तुकोबा फुलविला
पळस हा काव्याचा ।।३।।

राजभाषा मराठी
कशी हसली खेळली
शिव दरबारी ती
शूरवीरांची बोली ।।४।।

लिपी देवनागरी
काना मात्रा उकार
वेलांटी अनुस्वार
शब्द देई आकार ।।५।।

शब्दा - शब्दांमधुनी
वाहतो ज्ञान झरा
मराठी सांभाळते
इतिहासाची धुरा ।।६।।

10. ओळखशील कसा आजच्या निसर्गाला?

पोपटा - पोपटा तू पिंजऱ्यात अडकला कसा?
अजूनही निसर्गाशी इमान तू राखला कसा?
रंग हिरवाच ठेवला पंखा नि लाल चोचीला
काळी गुलाबी झालर ठेवलीस तू मानेला ।।१।।

छाटलेल्या पंखाने धडपडतो पिंजरा तोडण्याला
आणि विचारानेच घालतो फेऱ्या निळ्या नभाला
पाहुनी पिंजऱ्यातल्या तुझ्या सुंदर लाल चोचीला
वाटतो जणू पुन्हा आज पळसाला बहर आला ।।२।।

एकच लक्षात ठेव पोपटा काय सांगतो मी तुला
नको तोडू तू कधीही या सुंदर पिंजऱ्याला
अरे ओळखशील कसा तू आजच्या निसर्गाला?
तोही आता खूप बदलला दिसतो भुरकटलेला ।।३।।

आता काय सांगू मी पोपटा तुला
यंदा पळसही नाही रे फुलला
सूर्यानेही केलेत दूर सोनेरी किरणाला
पाहता - पाहता जमीनेही रंग बदलला ।।४।।

नकोस दोष देऊ या पिंजऱ्याला
तू येथेच बरा असा अडकलेला
ठेव जपून तुझ्या गोड आठवणीला
जिद्द निसर्ग भेटीची, हा भ्रम पुरे जगण्याला ।।५।।

11. पीक कपाशीच

पीक कपाशीचं पहा
कसं आज बहरलं
जसं निळ्या नभातलं
चांदणं भूवर आलं ।।१।।

हिरव्यागार पानांत
सोनं पांढरं फुललं
कसं टपोरं - टपोरं
मन पाहून भुललं ।।२।।

बोंड हिरवी - हिरवी
दिसे डोळ्या छान - छान
हसे कपाशीचे पान
पडता रविकिरण ।।३।।

कपाशीच्या रूपा मंदी
जणू आज अवनीनं
नेसला शालू हिरवा
नि पदरावर चांदणं ।।४।।

पीक पाहून हिरव
मना फुटली उकळी
सुखावला बळीराजा
फुलता घामाची कळी ।।५।।

12. धर कास तू शिक्षणाची

मित्रा जोवरी पाढे तू रटत नाही
तोवरी गुंता अंकाचा सुटत नाही

नि: संकोच तू विद्या वाटत जावी
कारण वाटल्याने ती घटत नाही

जगी विद्या धन एकमात्र ऐसे
की ज्यास चोरही लुटत नाही

जया लागला शिक्षणाचा लळा
त्याचे पुस्तकांशी नाते तुटत नाही

धर कास तू शिक्षणाची या जीवनी
मग पहा आत्मा तुझा घुटत नाही



13. फुलल्या कळया

काना मात्रांच्या फुलल्या कळया
कशा शब्दवेलीवरती सगळया ।।धृ।।

इकारा - उकारा कैसा बहर आला
अनुस्वारालाही पहा कंठ फुटला
सुरात गातात वेलांट्या सगळया
कशा शब्दवेली वरती सगळया ।।१।।

अवतरण चिन्हाचा हा हट्ट कसा?
म्हणे लिहावा शब्द जशाच्या तसा
स्वल्पविरामही मारतो उसळया
कशा शब्दवेली वरती सगळया ।।२।।

जेव्हा होतात भावना अनावर
उदगार चिन्ह बसे आसनावर
विसर्ग चिन्ह वाजवतो टाळया
कश्या शब्दवेली वरती सगळया ।।३।।

शब्दातही असतात रूसवे फुगवे
विराम चिन्ह करी सुरू पर्व नवे
आनंदाने खेळतात अक्षरं पाकळया
कशा शब्द वेलीवरती सगळया ।।४।।

14. घडी

घडी म्हणे चालते मी
पहा कैसे टिक - टिक
न थांबता रात्र दिन
दाविते समय ठीक ।।१।।

जरी आम्ही तीन काटे
आकाराने छोटे - मोठे
तरी नाही भेदभाव
काम साऱ्यांचेच मोठे ।।२।।

सर्वां आमुचे सांगणे
करा कामे वेळेवर
नको ढकला ढकली
आजचे ते उद्यावर ।।३।।

हर क्षण अनमोल
नका घालू त्यासी व्यर्थ
लावा तयाला सत्कर्मी
टळती सारे अनर्थ ।।४।।

ज्यास वेळेची पारख
तोचि खरा ज्ञानवंत
करुनी क्षणाचे मोती
जगी होई किर्तीवंत ।।५।।

15. तूचं हो तुझा शिल्पकार

मित्रा पुरे तुझे रडणे अपयशावर
आता तूचं हो तुझा शिल्पकार
दे उठूनी तुझ्या स्वप्नांना आकार
आणि कर तुझे स्वप्न तूचं साकार ।।१।।

भाज श्रमाच्या चुलीवर ध्येयाची भाकर
वाहू दे या देहातूनी आज घामाच्या धारा
होतात तर होऊ दे पायांना जखमा जरा
लागू दे त्या जखमांना थोडा ऊन वारा ।।२।।

झोंबू दे तुझ्या अंगाला गार - गार वारा
तुडव पायाखाली विस्तवाचा निखारा
आवर तू या अश्रूंच्या वाहत्या धारा
तूचं पेटव तुझ्या विजयाची मशाल जरा ।।३।।



16. तूही घे एक उंच भरारी

तूही घे एक उंच भरारी
तोड तुझी बंधन सारी
पहा भोवताल तुझ्या
पाखरं उडती कितीतरी ।।१।।

पुरे आरशात निहाळणे
आणि ध्येयहीन जगणे
सोड सारे तू उणे दुणे
शिक आकाशात उडणे ।।२।।

पहा घेऊन एक भरारी
मिळतील तुला सोबती
निळया नभी कितीतरी
तुझ्या अवती भोवती ।।३।।

झुल आकाशातला झुला
मी एक खग सांगतो तुला
तूही घे एक उंच भरारी
तोड तुझी बंधन सारी ।।४।।

17. थेंब पाण्याचा

थेंब पाण्याचा दिसतो
छान - छान मोत्यापरि
जेव्हा तो असतो एक
दवबिंदू तृणावरी ।।१।।

धरा नववधूपरि
शालू हिरवा नेसते
जेव्हा काळ्या मेघातूनी
वर्षा राणी बरसते ।।२।।

शुभ्र दिसती शिखरं
जैसी ओढली लोकर
भासतात पऱ्यापरि
ते हिमकण सुंदर ।।३।।

पहा वाहते सरिता
कैसी पानां - फुलांतूनी
थेंब पाण्याचा खेळतो
संग प्रवाह बनूनी ।।४।।

मेघ करितो गर्जना
थेंबाच्याच बळावर
सागर दावी रूप
थेंबाच्याचं जोरावर ।।५।।

थेंब पाण्याचा जोवरी
लपूनी राही डोळयात
नच कळे कुणा भेद
जरी पाही दर्पणात ।।६।।

18. मनुजा

मनुजा तू चालत जावे
वाटंकडेला पाहत जावे

कैसी उमलली फुले
त्यास तू न्याहाळत जावे

ओलांडूनी धोंडे सारे
नदीपरि तू वाहत जावे

दिसता तुला गरजवंत
त्याकडे तू धावत जावे

आयुष्य हे रणांगण
येथे तू लढत जावे

गिर्यारोहणापरि तू
पर्वताला कापत जावे

सुख - दुःखा मानुनी इंद्रधनू
जीवन तू जगत जावे

नको ठेवू हिशोब अश्रूंचा
जगी तू चालत जावे

19. मला किती छान वाटत आहे

मला किती छान वाटत आहे
सकाळचे आठ वाजत आहे
अजूनही बाळ झोपेत आहे
कारण कोकिळाने तिचे गाणे बंद आहे ।।१।।

आता दुपारीही छान झोप लागते
वातावरणही शांत - शांत आहे
दुपारच्या झोपेत गोडवा जाणवत आहे
कारण सुतार पक्षाची टकटक संपली आहे ।।२।।

मी बाजारातून बनावटी फुलं आणली आहे
आता बाळ माझे सुरक्षित आहे
कारण मधमाशीच्या डंखापासून ते दूर आहे ।।३।।

बाळ परीक्षेत चांगले गुण आणणारच
याची मला पूर्ण खात्री आहे
कारण लक्ष वेधून घेणाऱ्या बाबी संपल्या आहेत
फुलपाखरं तर जवळपास संपलीच आहे ।।४।।

विज्ञानाने बरीच प्रगती केली आहे
किडे किटकुले नाश पावली आहे
म्हणून पाखरांचाही त्रास संपला
घरात खोपा करण्याचा प्रकार संपला ।।५।।

आता धान्याचा एकही दाणा वाया जात नाही
कारण चिमणीचं घरात येत नाही
घरातले भांडेही खराब होत नाही
कारण कावळा पाण्यात चोच मारत नाही ।।६।।



20. क्षितिजापर्यंत जायचे आहे

क्षितिजापर्यंत जायचे आहे
स्वप्न तुझे पूर्ण करायचे आहे

तसाच ठेवला मी कोपरा घराचा
आठवांना तुझ्या जपायचे आहे

ठाम उभा मी जीवनाच्या वाटेवर
कार्य तुझे अधूरे पुढे न्यायचे आहे

जरी खलतात तुझ्या आठवणी
तरी क्षितिजापर्यंत जायचे आहे

मनी बाळगून विश्वास हसतो जगी
कारण पुढील जन्मी तुला भेटायचे



21. गोगलगाय

गोगलगाय - गोगलगाय
येथे एकटी बसून करशील काय? ।।धृ।।

चल येऊ फिरून बाजार सगळा
आणू भेंडी आणू मेथी मुळा
पाहू तिथली दुधी नि कोहळा
घेऊन येऊ भला मोठा भोपळा
गोगलगाय - गोगलगाय
बाजारात तू चलशील काय? ।।१।।

चल आपण बागेत जाऊ
तिथली फुलपाखरे पाहू
खेळू घसरगुंडी घेऊ झोके छान
उडवू आपण कागदाच विमान
गोगलगाय - गोगलगाय
बागेत तू खेळशील काय? ।।२।।

चल आपण नदीकाठी जाऊ
तिथले छोटे मोठे मासे पाहू
तिथल्या गार - गार पाण्यात खेळू
हिरव्या - हिरव्या गवतावर लोळू
गोगलगाय - गोगलगाय
नदीत तू पोहशील काय? ।।३।।

22. छकुली

छकुली दिसते फुलांसारखी
बोल तुझे कोकिळा सारखे
घरभर फिरते इकडून तिकडे
बागडणाऱ्या फुलपाखरा सारखे ।।१।।

एकदा चुकून तिच्या खिडकीपाशी
उडत आली एक मधमाशी
म्हणून छकुली आनंदाने फुलली
कोणीतरी आले बोलण्या तिच्याशी ।।२।।

का गं तू एवढी अशक्त कशी?
निरागसपणे छकुली बोलली
आज काल फुल कुठं उरली?
मंद स्वरात मधमाशी बोलली ।।३।।

ये ना तू माझ्या घरात छकुली बोलली
शोकेसमध्ये किती सारी फुलं ठेवली
मी काढली भिंतीवर फुलं खूप सारी
फुलांनी सजले आहे पडदे नि चादरी ।।४।।

हवी तेवढी फुलं घेऊन जा तुझ्या घरी
पण नकोस तू राहू अशी उपाशी
अग मी आहे ना मैत्रीण तुझी
मग तुला काळजी कशी ।।५।।

मधमाशी तिला म्हणाली
मला नको फुलं तसली
बराच वेळ मी इथं थांबली
रागावेल मला राणी मधमाशी ।।६।।

छकुली खुदकुन गालात हसली
मनात तिला बावळट म्हणाली
एवढी सारी फुलं असून घरात
मधमाशी उगीच फिरते उन्हात ।।७।।

23. शिवार

आरं फुलीवं तू आपुलं शिवार
त्यांमंधी लावून वृक्ष हिरवीगार

मंग पाय कशे येतीन पक्षी हजार
बांधायेले घरटे तुह्या शिवारात
तेबी फुलवतील आपुला संसार
आरं होकी तू त्या घरट्याचा शिल्पकार ।।१।।

तुह्या शिवारात गाईल कोकिळा गाणी
वाहिल त्यातून निसर्गाचं झुळझुळ पाणी
बहरून जाईन तुहं शिवार फळाफुलांनी
त्या शिवारातून टिपून दाणा जाईन चिमणी ।।२।।

मानसा - मानसा आरं होकी माणूस
घे तू समजुनी गरज काळाची खास
साध निसर्गाचा समतोल पुन्हा एकवार
करुनी वृक्षारोपण पुलव तुहं शिवार ।।३।।

24. बाभूळ

झाड बाभळीचे झेलते ऊन वारा पाऊस
तरी तया ठायी आहे रे जगण्याची हौस ।।धृ।।

साल काळी म्हणूनी नाही बसत रडत
सोसुनिया ऊन वारा पहा जातो वाढत
घेतो अंगावर कधी तो विजांचा पाऊस
तरी तया ठायी आहे रे जगण्याची हौस ।।१।।

जरी कुणी देत नाही पाणी तया मुळा
तरी फुलवितो सोन्यापरि फुलांचा मळा
जरी नाही करत कुणी त्याची विचारपूस
तरी तया ठायी आहे रे जगण्याची हौस ।।२।।

झाड बाभळीचे मनुजा देते संदेशा खास
झिजू दे देह जनकल्याणा सोसुनिया त्रास
जरी निधड्या छातीवर तुझ्या पडला पाऊस
तरी तुझ्या ठायी असावी रे जगण्याची हौस ।।३।।

25. झरा

झरा वाहतो - वाहतो
वनातूनी गार - गार
देतो पाणी वेली - फुलां
करितो हिरवेगार ।।१।।

जेव्हा पडती त्यावर
रविकिरणे सुंदर
थेंब पाण्याचे दिसती
जैसे मोती खरोखर ।।२।।

झरा धरी ताल सूर
झुलत्या गवतावर
गीत गाई नवे - नवे
आणि डोले गवतावर ।।३।।

झरा जणू संजीवनी
पशुपक्षां देई पाणी
झऱ्या वनात पाहुनी
कोकिळाही गाई गाणी ।।४।।

झऱ्यास म्हणती सारे
नको जाऊ ऐसा पुढे
थोडा वेळ थांब येथे
मग जा खुशाल पुढे ।।५।।

झऱ्या आवडे वाहणे
म्हणे वाहणे जगणे
जातो मी सागराकडे
ओलांडूनी सारे धोंडे ।।६।।

26. वेड्या मना

वेड्या मना कैसे समजावू मी तुला
नाही दिली भाकर चिंतेने कुणाला ।।धृ।।

रोग चिंतेचा मारी तीळ - तीळ जिवा
आणि विझवी पहा जीवनाचा दिवा
तू प्रार्थनेत मागावे आपुल्या प्रभूला
वेड्या मना कैसे समजावू मी तुला ।।१।।

निरखूनी पहा आकाशातील पाखरां
ना पेरीता ना कापीता मिळतो चारा
उडती कैसे नभात गौरविती प्रभूला
वेड्या मना कैसे समजावू मी तुला ।।२।।

तुचि पहा फुले रानातली फुलली कशी?
जरी ना सूत कातीती तरी सजली कशी?
प्रभू हा अदृश्य माळी सर्व कळे त्याला
वेड्या मना कैसे समजावून मी तुला ।।३।।

पहाटचे तृण होता सांज होई गवत
तेही परमेशाच्या नजरेतून दूर नव्हत
बहुत चिमण्यांपेक्षा तो गणीतो तुला
वेड्या मना कैसे समजावून मी तुला ।।४।।

27. सरिता

अश्रू माझे कामी येतील का तुझ्या सरिता
आणण्यास पुन्हा तुझी हरवलेली सुंदरता
आजही मला ते दिवस आठवतात
जेव्हा भेटत असे मी तुला एकांतात ।।१।।

हृदयातून तुझ्या कैसे जल वाहे भरूनी
काठ तुझी दोन्ही बहरलेली वेलीफुलांनी
पाण्यातला भोवरा जणू गालातली खळी
शेवाळाचा शालू हिरवा दिसे शोभुनी ।।२।।

तू करीत असे संवाद निसर्गाशी
अबोल मी ऐकी तो लपूनी
मन माझे तू घेई ओढुनी
जशी टाकावी कुणी मोहनी ।।३।।

वर्णू कशी मी तुझ्या उदारतेची महती
तुझ्यामुळे वृक्षा जल मिळे मन भरूनी
पक्ष्यांस मिळे घरटे हर फांदीवरी
मत्स्याची होतीस तू जलजीवनी ।।४।।

तुझ्यामुळे गुरास मिळे चारा बेहिशोबी
अन् बगळा मेला नाही कधी उपाशी
हिंस्त्र प्राण्याची होतीस तू सखी
वाढवून अरण्य प्राण त्यांची रक्षी ।।५।।

तू वाढविलेल्या वृक्षांची करुनी तोड
मानवाने बिघडविला पर्यावरणाचा तोल
बांधुनी जागोजागी बांध आणि धरणं
घेतले हिरावून तुझे रुप मनोहर ।।६।।

सरिता तू पुन्हा वाहशील का?
एकांतात पुन्हा मला भेटशील का?
पुन्हा आणण्यास तुझे रूप मनोहर
हे माझे अश्रू तुझ्या कामी येतील का? ।।७।।

28. माझी शाळा

माझी शाळा माझी शाळा
जसा की फुलांचा मळा
पहा अक्षर वेलींनी
सजलेला काळा फळा ।।१।।

मुले सारी गाती कैसे
सुमधुर राष्ट्रगान
रोप्यापरि दिसतात
चिमुकली किती छान ।।२।।

येता गुरुजी वर्गात
पाढे गुंजती स्वरात
अशी होते पहा येथे
दिवसाची सुरवात ।।३।।

एबीसीडी क ख ग चा
पडतो पाऊस मोठा
भूक लागता दिसतो
पुढे खिचडीचा वाटा ।।४।।

कधी खेळ कधी योगा
कधी कबड्डीचा सामना
कुठे येते अशी मजा
मित्र आणि शाळेविना ।।५।।

माता जीव लावी बाळा
तशी जीव लावी शाळा
मला वाटे प्रिय फार
माझी शाळा माझी शाळा ।।६।।



29. अशी हाय माही माय

लुगड्याले ठिगळ अन् डोक्यावर पदर
सकायीच करते चुलीवर भाजी भाकर
म्हणते पोटभर खाय अन् साळत जाय
पाटी पेन्सिल हाय अजूक पाहिजे काय? ।।१।।

साळत कवा तिचा पाय पडला नाई
तरी बी संसाराचं गणित चुकवलं नाई
कमी पैशात ती परपंच चालवत हाय
कारण संसाराची ती पीएचडी होल्डर हाय ।।२।।

फाटका पदर डोक्यावून कवा पडला नाई
नव्या लुगड्यासाठी ती कवा रडली नाई
कोड्डा तुकडा गिळून बाजूला ठेवते साय
म्हणते भरपूर खाय अजूक भाजी हाय ।।३।।

मिह्या ओढव्या पेनशिलीन पाटीवर रेघा
म्हणून ती ओढते खुरप्यान मातीवर रेघा
तिच्या या कष्टाले मी म्हणू तरी काय?
डोयातलं दुःख लपवून हसते माही माय ।।४।।

30. ये तू परतूनी घरा

वेड्या पाखरा ये तू परतूनी घरा
वाट तुझी पाहतो घरचा कोपरा ।।धृ।।

सोड रूसवा पहा दिन कलला
येतो मी ऐसे म्हणूनी तू गेला
तुजविण जीव झाला बावरा
वेड्या पाखरा ये तू परतूनी घरा ।।१।।

तुझा रूसवा छळतो काळजाला
अश्रुधारांनी मी ओवाळते तुला
तुजविण खाली वाटतो पिंजरा
वेड्या पाखरा ये तू परतूनी घरा ।।२।।

पिंजते मी तुझ्या आठवणीला
केव्हा परतशील तू सांग मला
तुजविण व्यर्थ सारे फिर जरा
वेड्या पाखरा ये तू परतूनी घरा ।।४।।

31. शब्दांची किमया

शब्द शब्दांचा खेळ, बसवावा योग्य मेळ
अर्थ निघता सरळ, होतील कामे सरळ
चुकता शब्दांचा खेळ, अनर्थ हा अटळ ।।१।।

शब्द शब्दांचा सागर, ज्ञानाचे अपार भंडार
शब्द शब्दांचा वापर, प्रभाव त्याचा जीवनावर
शब्द चांगले जिभेवर, तूप मिळेल रोटीवर ।।२।।

शब्द शब्दांचा वार, भांडणे होतील फार
शब्द चुकवतात युद्ध, शब्द सक्षम फार
कराया सुखी संसार, वाढवावे शब्द भंडार ।।३।।

शब्दच देतात प्रेरणा, पांगळ्या चालण्यास
शब्दच होतात कारण, वीरासही पळण्यास
शब्द दावी शहाणपण, तेच दावी मूर्खपण ।।४।।

32. गाऊ आम्ही जयगीत

गाऊ आम्ही जयगीत न्हाऊ प्रकाशात
फुलले चांदणे स्वातंत्र्याचे आकाशात ।।धृ।।

स्वातंत्र्याचा आम्ही उधळू गुलाल
हसतो रवि जाहले गुलाबी गाल
आली रविकिरणे घेऊनी सोनेरी प्रभात
फुलले चांदणे स्वातंत्र्याचे आकाशात ।।१।।

गातो आम्हासंगे हा झुळझुळ वारा
म्हणे पहा आसमंती तिरंगा प्यारा
कैसा विराजला साऱ्यांच्या हृदयात
फुलले चांदणे स्वातंत्र्याचे आकाशात ।।२।।

सुमधुर गीतांचा गजरा विणला पक्ष्यांनी
आनंदाने डोलतो सृष्टीतला हरएक प्राणी
म्हणे पहा तिरंगा आमुचा निळया गगनात
फुलले चांदणे स्वातंत्र्याचे आकाशात ।।३।।

33. माझा बाप

बाप माझा राबतो काळ्या मातीत
काटा मोडतो बाभळीचा पायात ।।धृ।।

प्रेम बापाचे कळावे तरी कसे?
नि:शब्द टाकी दुःखाचे उसासे
पाषाणापरि मुद्रा प्रेम डोळ्यात
काटा मोडतो बाभळीचा पायात ।।१।।

देतो घेऊनी मला भारीचा जोडा
अनवाणी पायाने सोसतो पीडा
उचलून घेतो खांद्यावर उन्हात
काटा मोडतो बाभळीचा पायात ।।२।।

त्याच्या डोईवर घराचा भार
त्याच्यामुळं शाबूत घराच छप्पर
धाव - धाव धावतो नाही उसंत
काटा मोडतो बाभळीचा पायात ।।३।।

34. भूगर्भातलं केशर

पीक हळदीच पहा
आज कसं बहरलं
भूगर्भातलं केशर
शिवारामंदी फुललं ।।१।।

पानं हिरवी - हिरवी
वाऱ्यासंग डोलतात
जसा थवा पोपटाचा
उतरला वावरात ।।२।।

पाणी वाहे झुळझुळ
भिजे हळदीचे मूळ
न्हाती पक्षी पाण्यामंदी
उडती भरूनी चूळ ।।३।।

फूल शुभ हळदीच
दिसे नयनी क्वचित
फूल दिसता चंदेरी
आनंदीत होई चित्त ।।४।।

35. सुस्वागतम

स्वागतम् - स्वागतम् सुस्वागतम
सकल अतिथीगण सुस्वागतम ।।धृ।।

सुस्वागतम सकल जना या शुभ दिनी
तव शुभ पदांनी जाहला हर्षध्वनी
गाती सुंदर आज ही प्रभा सुस्वागतम ।।१।।

पडता आपली गोड सावली
आनंदाने वसुंधरा बहरली
सुखावले हे नयन सुस्वागतम
सकल अतिथी गण सुस्वागतम ।।२।।

मानितो आभार सकलांचे
झालात साक्षी या सोहळ्याचे
उधळूनी शब्द सुमने सुस्वागतम
सकल अतिथीगण सुस्वागतम ।।३।।

36. पाणी

देवा तुझिया जवळी
नाही मागत संपत्ती
मला हवं फक्त पाणी
तुला मी आळवू किती ।।१।।

पाणी येईल नळाला
असं म्हणता - म्हणता
गेले रे दोन दिवस
वाट पाण्याची पाहता ।।२।।

घडाभर पाण्यासाठी
किती माझी भटकंती
तूच सांग पाण्यासाठी
वणवण फिरू किती ।।३।।

देवा मागते मी पाणी
जर देत नसशील
आज तू मला रे पाणी
तर एवढे देशील ।।४।।

अशी येऊ दे डोळ्यांना
आसवांची तू भरती
की भरावा आसवांनी
एक प्याला तरी पाणी ।।५।।

म्हणजे अर्ध्यावर मी
भागविन तहान नि
अर्ध्यावर करीन मी
घरातील धुणी भांडी ।।६।।

37. माझी सावली

सकाळच्या वेळी मला
माझी सावली भासली
जशी सुंदर बाहुली
पण हाती ना लागली ।।१।।

ऐन दुपार प्रहरी
होती माझ्या पायाखाली
तेव्हा मी शोधत होतो
माझ्यासाठी एक बाहुली ।।२।।

तिचं सावली दिसली
पर्णहीन वृक्षापरि
सायंकाळच्या वेळेला
जी होती वाट कडेला ।।३।।

तेव्हा मी शोधत होतो
एक सुंदर बाहुला
लाडक्या बाहुलीसाठी
सायंकाळच्या वेळेला ।।४।।

आता चंद्राच्या तेजात
मला माझी सावली
भासली ती वेळूपरि
वाऱ्याने हलू लागली ।।५।।

आठवांच्या गाठोड्यात
शोधी छोटीशी बाहुली
आणि तिची लहानशी
सकाळची ती सावली ।।६।।

38. कविता

भावनेच्या ओघात
शब्द उतरले कागदावर
रूप घेऊन कवितेचे
हृदयात रूजले खोलवर ।।१।।

शब्द होते निर्जीव
त्यात कवितेने टाकला जीव
ओतला त्यात जीवन रस
केले त्या शब्दांना सजीव ।।२।।

बेभाव होते शब्द
कवितेच्या सहवासाने
लाभला त्यासी मान
झाले ते लाख मोलवान ।।३।।

तिने शब्दा केले अमर
उतरूनी कागदावर
तो कागदही झाला अमर
आज तिच्यामुळे खरोखर ।।४।।

39. असं होत बालपण

असं होतं बालपण
जरी नव्हते खिशात धन
तरी आनंदीत होत मन ।।१।।

तशी छोटीच होती शब्दावली
पण शब्द त्यातले खरे होते
शब्दांचे भावनेशी
खेळीमेळीचे नाते होते ।।२।।

तेव्हाही होताच रूसवा फुगवा
घेऊन द्या मलाही जोडा नवा
नाहीतर घेऊन द्या एक फुगा ।।३।।

शेत शिवार तेव्हा कवडीमोल वाटायची
भोवरा, कंच्या आणि आंब्याच्या कोया
हीच खरी प्रॉपर्टी वाटायची ।।४।।

काळाच्या ओघात हरवलं बालपण
घेऊन खिशात धन फिरतो वणवण
जर सापडलं मला लहानपण
तर करीन त्यावर निछावर सारं धन ।।५।।

40. जीवन

हरघडी मृत्यू छायेत जगते हे जीवन
तरी पहा हरघडी कैसे हसते हे जीवन

जरी आहे अंधार दाटलेला हा चोहीकडे
तरी गीत आनंदाचे गुणगुणते हे जीवन

जरी दिसते निर्जनभूमी पसरलेली दूरवर
तरी फुलं आनंदाची फुलविते हे जीवन

जरी काटे कुसळं जीवनाच्या वळणावर
सारुनी बाजूला तया चालते हे जीवन

म्हणे मृत्यूचे काय येईल जेव्हा पाहू तेव्हा
हर क्षण आनंदाने जगा सांगते हे जीवन



41. फुलपाखरू

पहा हे फुलपाखरू
दिसते किती सुंदर
पंख रंगीबेरंगी हे
नेत्रदीपे खरोखर ।।१।।

बागडते फुलावर
ते इकडून तिकडे
खेळी गार वाऱ्यासंगे
आणि उडे चोहीकडे ।।२।।

कधी बसे फुलावर
कधी बसे तृणावर
लपे कधी पानामागे
निजे कधी मातीवर ।।३।।

मना गोड वाटे त्याची
निरागस चंचलता
हर क्षण तो जगतो
कसा उडता - उडता ।।४।।

कशाचीही नाही पर्वा
छंद फक्त उडण्याचा
आयुष्य छोटे की मोठे
हिशोब ना ठेवी त्याचा ।।५।।

जगणे म्हणजे काय?
सांगतो फुलपाखरू
हर क्षण जगण्याचा
तू नि मी रे यात्रेकरू ।।६।।



42. जीभ

जशी आग इवलुशी
पेटवते सारे रान
तशी जीभ इवलुशी
पेटवते शब्द रान ।।१।।

जीभ मारीते हुशारी
धन बुद्धी दौलताची
म्हणे मीच एक गुणी
तिस भूक कौतुकाची ।।२।।

जिभे लागे तेची गोड
ज्यास नको म्हणे पोट
तरी करी मनमानी
तिचा भार वाही पोट ।।३।।

साप ईचू तरी बरा
भीती पोटी करी दंश
तेही करी एकदाच
जीभ मारी अंश - अंश ।।४।।

जीभ निष्पाप हे सत्य
मतिच्या हाती कासरा
मती करी करामती
दोष जिभेवरी सारा ।।५।।

ठेव शुद्ध तुझी मती
तुझी जीभ तुझ्या हाती
घाल जिभेवरी आळा
होशी औक्षवंत बाळा ।।६।।

43. कवी

कवी ह्रा प्राणी दुर्मिळ असतो
तो क्वचितच आढळत असतो ।।धृ।।

कधी बागडतो फुलपाखरासंगे
कधी नाचतो उनाड वाऱ्यासंगे
कधी बोलतो मनमोकळे वृक्षासंगे
तर कधी तो गुणगुणतो झऱ्यासंगे ।।१।।

कधी होऊन विहंग घेतो उंच भरारी
कधी क्षितिजा पलीकडे जाते स्वारी
आला फिरूनी अवघा ब्रम्हांड जरी
तरी शेवटी विराजतो शब्दवेलीवरी ।।२।।

कधी होतो फुल तर कधी फुलपाखरू
जगी पहावा तर तोचि खरा कल्पतरू
फुलविण्या कविता कधी होतो बासरी
तर कधी सूर होऊनी गातो तालावरी ।।३।।

44. मला येत नाही

उगीच कुणाला भूलथापा मला देता येत नाही
नि डाव खोटा - खोटा मला खेळता येत नाही

जरी पारध असतो बहुदा माझ्या डोळ्यापुढे
तरी धरण्यास फास मला टाकता येत नाही

लागतात ठेचा बहुत या जालीम दुनियेच्या
पण पाय जखमी मला दाखवता येत नाही

माझ्यावरही गुदरतात डोंगर हे दुःखाचे
पण भांडवल त्याचे मला करता येत नाही

असंख्य संकटांना तोंड देत मी जातो पुढे
ध्येयाविना श्वास मला घेता येत नाही

45. मृगसरी

आभाळातून बरसल्या मोत्यावाणी मृगसरी
हरूनी ताप धरेचा वाजवी आनंदाची बासरी
मुले आनंदाने नाचती पाहुनी बरसत्या सरी
मृगसरीसंगे कोणी ताल धरी कोणी सूर धरी ।।१।।

खेळतो अंगाभोवती गार वारा
उतरला आज उन्हाचा पारा
मोरावाणी फुलला आभाळाचा पिसारा
फुलली जाई जुई आणि फुलला मोगरा ।।२।।

निळया - निळया नभात
पक्षी उडे गीत नवे गात
आली हसत खेळत सोनेरी प्रभात
पाहुनी मृगसरी नाचे मयूर तालात ।।३।।

या मृगसरींनी धरेत फुंकला पुन्हा प्राण
नेसविला वसुंधरेला हिरवा शालू छान
पाहुनी रूप वसुंधरेचे हरपून गेले भान
या मृगसरींनी भागवली धरेची तहान ।।४।।

46. पारवा

एक पारवा झेलतो कहर उन्हाचा
तरी सोडत नाही छंद उडण्याचा

जीव त्याचा पाहिला तर इवलुसा
तरी संघर्ष तो काय? सांगे माणसा

उडतो आकाशी अन् हसतो स्वतःशी
एकटाच करतो दोन हात तो उन्हाशी

भीती कशी वाटत नाही त्याला कुणाची
ध्येयापुढे झळ कशी लागत नाही उन्हाची

उडतो आकाशी अन् ठेवतो नजर खाली
कुणी बरे त्याला ही माणुसकी शिकवली?

उन्हातही उडतो कसा उंच - उंच आकाशी
तरी नाही तोडली नाळ आपुल्या मातीशी



47. पुन्हा एकदा

पुन्हा एकदा गीत नवे गायचे आहे
सूर हरवलेले नव्याने शोधायचे आहे

जरी वादळाने मोडले घरटे आपुले
तरी पुन्हा हिमतीने बांधायचे आहे

सुख दुःख रंग दोन हे आयुष्यातले
चित्र मिटलेले पुन्हा रंगवायचे आहे

जरी सुकली पानं - फुलं पाण्याविना
तरी रान नव्यानं फुलवायचे आहे

ह्या दऱ्या खोऱ्या नि हे उंच पर्वत
म्हणती पुन्हा तुला चढायचे आहे

जरी दिसते ही वाट नागमोडीची
तरी नको थांबणे चालायचे आहे

48. मैत्री

मित्रा तुझ्या मैत्रीला दुजोरा माझा
फुटलेल्या पालवीला मुजरा माझा

येऊ दे अंगावर कितीही वादळ वारे
झेलीन मी तू असता सहारा माझा

चंद्र पुनवेचा असो वा नसो नभात
चालेल मी तू असता शुक्रतारा माझा

उसळू दे या सागराच्या उंच - उंच लाटा
नाही भीती तू असता किनारा माझा

49. एवढं मलाही कळतं

पिकलं पान एक दिन गळत
एवढं मलाही कळतं
पण पिकल्या पानाची सावली
किती गोड असते
हे जगाला कुठं कळतं ।।१।।

आला जगी त्यां मरण अटळ
एवढं मलाही कळतं
पण तुकडा काळजाचा पडणे
म्हणजे काय असत
हे जगाला कुठं कळतं ।।२।।

समय करील बरोबर सगळं
एवढं मलाही कळतं
पण वण जखमेचे मात्र
कायम राहतात
हे जगाला कुठं कळतं ।।३।।

50. पाण्यासाठी

जीव धोक्यात घालून हरिणी पिते घोटभर पाणी
आणि तू रे मनुजा का उगीच वाया घालतो पाणी

जगण्याचा छंद होता वनात बऱ्याच वेली - फुलांना
मेली बिचारी पाण्याविना ना लाभले जीवन त्यांना

अरे तूच पहा थोडे तुझ्या आजू बाजूला
कसे अनवाणी पाय शोधतात पाण्याला

अशीच नाही बरसत बरं का ही वर्षाराणी
तापलेल्या धरेला करावी लागते विनवणी

आभाळाचे हृदय चिरून बरसतात मोती
मग कुठं आनंदाश्रुत न्हाते ही काळी माती

पाण्याविना कोण करील जगण्याची कल्पना
पाणी हे अनमोल रे मनुजा तुझिया जिवना

कित्येकांचा येथे पाण्याविना सुकतो गळा
थेंब पाण्याचा शोधतो अश्रूंनी भरलेला डोळा

51. हिवाळा

ऋतू हिवाळा - हिवाळा
कैसा आगळा वेगळा
हिरव्या गवतावर
पहा खेळतो बगळा ।।१।।

थंडी गुलाबी - गुलाबी
ओढी धुक्याची चादर
दवबिंदू मोत्यापरी
पसरले सभोवार ।।२।।

रान हिरवे - हिरवे
झाले जिकडे तिकडे
सुंदर फुलपाखरे
उडतात चोहीकडे ।।३।।

रविकिरणे सोनेरी
येती भेटाया पाखरां
पाहुनी गोड नजारा
पहा हसे वसुंधरा ।।४।।

ऋतू ऐसा गार - गार
येता निसर्गा बहर
पशु पक्षी, पानं फुलं
सारे करिती गजर ।।५।।

52. बगळ्या - बगळ्या दूध दे

बगळ्या - बगळ्या दूध दे
माझी पाचही बोटं रंगू दे
आज काय झाले बगळ्याला
की शो केस मध्ये रूसून बसला ।।१।।

शाळा सुटली शाळा सुटली
पाटी फुटली पाटी फुटली
तिचं पाटी का बरं अशी रूसली
भूतकाळाच्या कुशीत लपली ।।२।।

सुंदर नि उंच - उंच लेखन
जिने घडविले माझे जीवन
आज तिचं कोठे बसली दडून
आणू तिला मी कैसे शोधून ।।३।।

कडूलिंबा जागी मी बांधला बंगला
म्हणून चिऊताई लागली रडायला
म्हणे घेऊन माझ्या दोन पिल्लांना
जाते विजेच्या खांबावर राह्ायला ।।४।।

या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात
मीच मला कसा गेलो विसरत
बगळा, पाटी, लेखन आणि चिऊ
नका रे असे तुम्ही मला सोडून जाऊ ।।५।।

53. लालपरी

लालपरी - लालपरी
मज दिसे कैसी प्यारी
जपी सारी नाती गोती
ऐसी माझी लालपरी ।।१।।

सर्वां नेई नाना गावी
मनी भेदभाव नाही
असो रंक की तो राव
सर्वा सारखे ती पाही ।।२।।

शिशु वृद्ध आणि माता
यांचा करी बहुमान
नेई सर्वा सांभाळून
ठाव जीव अनमोल ।।३।।

ऊन असो वा पाऊस
सदा धावी रस्त्यावर
दिसो डोळ्या महामार्ग
किंवा वाट खडतर ।।४।।

कुणा नेई सासरला
कुणा नेई माहेराला
कुणा नेई ती शाळेला
तर कुणाला कामाला ।।५।।

कैसा हा ऋणानुबंध
करी यात्रा सुरक्षित
एस टी खरी लालपरी
आणी सौख्य जीवनात ।।६।।

54. मुसाफिरा

मुसाफिरा घे तू अंगावर वादळ वारे
पाहा तिमिरातही लुकलुकता तारे

जरी रात्र ही काळोखाने मंतरलेली
तरी कैसे लुकलुकतात काजवे रे

का म्हणतो मीच एकला चालतो वाट
संग ध्येय तुझे मग तू एकला कसा रे

प्रथम टाक पाऊल आपुले तू हिमतीने
मग पहा ईश होतो कैसा तुझा मित्र रे

जरी आडवीती मार्ग तुझा हे धोंडे
ठेवूनी पाय त्यावरी तू पुढे जा रे

दिसतात तुला तिमिराचा उच्चांक
होतो सूर्योदय तू गीत आनंदाचे गा रे

55. झेंडूची फुले

काळया मातीत - मातीत
कसं डोलते केशर
फुले फुलली झेंडूची
पहा आज सभोवार ।।१।।

फुले गोजिरी - गोजिरी
मन उल्हासे पाहुनी
साऱ्या शेता शिवारात
आले पाहुणे कोठूनी ।।२।।

रान दिसते केशरी
कुठं दिसते सोनेरी
बहरले झेंडू फुले
चोहीकडे कितीतरी ।।३।।

दरवळतो सुगंध
डोलतात आनंदाने
फुले सारी वाऱ्यासंगे
गीत गाती ती नव्याने ।।४।।

आज चंद्र प्रकाशात
फुलं वाटे शुक्रतारा
मंत्रमुग्ध आसमंत
पाहुनिया हा नजारा ।।५।।

56. वृक्षाची मुलाखत

गगनराज वृक्ष तू इतका बहरला कसा?
सर्वापेक्षा उंच नि इतका डौलदार कसा?
सर्वांच्याच अपेक्षा ह्या तुजकडून कशा?
सांग मुलाखतीत तू गुपित यशाचे कशात? ।।१।।

डोळे पान्हावून तो सावरला कसा बसा
नि हसून त्याने इतिहास आपुला आठवला
आठवून भूतकाळ किस्सा संघर्षाचा सांगितला ।।२।।

म्हणे केली मी काळाशी अतूट मैत्री
चांदणे होते डोक्यावर अन् जमीन खाली
कधी अंधार भोवती कधी वारा संगती
कधी चंद्र होता तर कधी सूर्य माथ्यावरी ।।३।।

नका जाऊ माझ्या या उंच बांध्यावरी
नका जाऊ माझ्या कळया नि फुलांवरी
नका जाऊ माझ्या फळांवरी
नका जाऊ माझ्या सुंदरतेवरी ।।४।।

गुपित दडले यशाचे हे जडामुळात
जे - जे दिसते नयनी ते सारे खोटे
जे दिसेना नयनी तेच सारे खरे
मी स्थिर नि शांत उभा जडांमुळे ।।५।।

57. बी

हे प्रिय बी आज मी तुला जमिनीत टाकत आहे
पहा जमिनीला फाडून तुला बाहेर यायचे आहे

काही दिवसातच तुला अंकुरित व्हायचे आहे
लवकरच रूप रोपट्याचे तुला घ्यायचे आहे

थांबायचे नाही तुला वृक्ष बनायचे आहे
सावलीच नाही तर कळ्यांनी भरून जायचे आहे

फुलांचा सुगंधच नाहीतर फळांनी सजायचे आहे
फळात देखील उद्यासाठी बीजं उगवायचे आहे



58. ह्रिवी पानं

सकाळी उगवलेली कोवळी पानं
फूलवत होती सभोवतालच रान
बागडत होती फुलपाखरं छान
वाऱ्यासंग डोलत होती कोवळी पानं ।।१।।

दुपार होता - होता ती लागली रडू
कारण त्यावर लागला धूर जमू
तया वाटे पाजला कोणी जहर
गुदरला त्यावरी धूराचा कहर ।।२।।

बिचारी विव्हळत होती ती पानं
गेली कशी अकाली कोमजून
भकास दिसू लागलं हिरवं रान
जे सकाळी दिसत होत छान ।।३।।

या प्रदूषणापाई संपलं हिरवं रान
कोणी घेईल का हे दुःख समजून
जी पानं दिसत होती टवटवीत सकाळी
त्या पानाखाली जाळे विणत होता कोळी ।।४।।

59. आजोबा न्या मला बागेत

आजोबा मी कम्प्युटरचा माऊस खेळला
म्हणून आपल्या घरातला उंदीर रूसला
जशी कम्प्युटरशी जमली माझी गट्टी
तशी घरातल्या पोपटाने घेतली कट्टी ।।१।।

आता घरात राहून मला कंटाळा आला
आजोबा चला ना बागेत खेळायला
मोबाईलवर फुलं किती छान दिसतात
काय आजोबा ती खरच बागेत असतात ।।२।।

म्हणे फुलांना खूप छान सुगंध असतो
कोण बरे त्यांच्यावर स्प्रे मारत असतो?
काय फुलपाखरे खरच बागडत असतात
काय त्यांना मम्मी पप्पा रागवत नसतात? ।।३।।

अस म्हणतात पक्षी उडतात आकाशात
पण विनारिमोट ते कसे खाली उतरतात?
काय खरंच जंगलात प्राणी उड्या मारतात
पण चार्जिंग संपली तर मग ते काय करतात? ।।४।।

सांगा ना आजोबा तुम्ही माझ्या मम्मीला
मलाही जवळून पाहायचे आहे निसर्गाला
कशी रंगीबेरंगी फुलपाखरे बागडतात
कसे प्राणी जंगलात उड्या मारतात? ।।५।।

60. येवो लाख अडथळे

येवो लाख अडथळे
जीवनात तुझ्या मित्रा
ठेव ध्येयावर डोळा
नको हटू मागे मित्रा ।।१।।

मार्ग विजयाचा जातो
अपयशाच्या गल्लीतूनी
टोचतात पाया काटे
येती अश्रू डोळ्यातूनी ।।२।।

क्षण येता निराशेचे
नच घाबरून जावे
ईश स्मरण करुनी
पुन्हा एकदा चालावे ।।३।।

अनुशासन एकचि
मंत्र खरा हा यशाचा
त्यासी अंगी बाणवावे
करावा सराव त्याचा ।।४।।

कवटाळूनी विजया
करावी सर्वांची सेवा
धर्म हा मानवतेचा
हर क्षण तू जपावा ।।५।।

61. कोरोना

कोरोना - कोरोना काहीही केल्या जाईना
आता आम्हाला क ख ग घ ही कळेना

तूच अभ्यास आणला मोबाईलवर
नेत्रां होतो त्रास दुखते डोके फार
शिक्षक आणि मित्रांचा तोडला संग
मित्राविना अभ्यास वाटतो बेरंग ।।१।।

आमच्या घरी एकच मोबाईल
सांग दोघात वाटता कसा येईल?
कधी मोबाईलमध्ये नसतो रिचार्ज
तर कधी मोबाईलच नसतो चार्ज ।।२।।

कसे शिकवावे प्रश्न हा शिक्षकापुढे?
कसे शिकावे प्रश्न हा आम्हापुढे?
पुरे झाला आता तुझा हाहाकार
सोशल डिस्टन्सिंगनेच करू तुला पार ।।३।।



62. गुलाब

पहा कैसे लीन नम्र
राजा फुलांचा गुलाब
गर्व नसे तया मनी
असूनही सौंदर्याचा धनी ।।१।।

हर ऋतुत फुलतो
हर भूमीत जगतो
झळ उन्हाची सोसूनी
कैसा गोंडस हसतो ।।२।।

जरी काटे हे भोवती
आपलेच त्या छळती
तरी जपे नाती गोती
सर्वां दावी खरी प्रीती ।।३।।

कधी बनूनी कळी
कधी होऊनी पाकळी
बारशाच्या पाळण्यात
खेळ आनंदाचा खेळी ।।४।।

लोकां आगता स्वागता
जाई धावुनी - धावुनी
जन्मो असो वा मरण
करी सुगंधित प्राण ।।५।।

होई तो हसुनी माळ
पडे प्रभूच्या गळयात
होई जीवन सफळ
त्याचे प्रभू चरणात ।।६।।

63. मोरा रे मोरा

मोरा रे मोरा
सुंदर तुझा पिसारा
सांग वनात नाचतो कसा?
सुटता गार - गार वारा ।।१।।

पतंग ग पतंग
किती सुंदर तुझा रंग
पंखाविना उडती कशी
होऊन तू विहंग? ।।२।।

बगळ्या रे बगळ्या
एवढा तू शुभ्र कसा
आणि हाताविना
मासा पकडतो कसा? ।।३।।

काजव्या रे काजव्या
किती रे तू इवलुसा
तरी अंधारात
लुकलुकतो कसा? ।।४।।

फुलपाखरा - फुलपाखरा
एवढा तू रंगीबेरंगी कसा?
आणि आईविना
तू बागडतो कसा? ।।५।।

64. भिंगोटा

एक भिंगोटा उडत होता आकाशात
पाहून मले तो आला भलताच रागात
म्हनला येऊन तो माह्या कानात
तुमी परगती केली बॉ आतोनात ।।१।।

करोडो रुपये खर्ची घालून तुमी
उपग्रह धाडता अवकाशात
पाहायला कवा पडीन पाऊस
काय सांगत होतो आमी तवापसुन? ।।२।।

आज आकाश झालं पारख अम्हाले
काय सांगावं बॉ आता आमी तुम्हाले
जिथं गाजवता तुम्ही आपली सत्ता
तिथं आमची बी हाय थोडी बहुत मालमत्ता ।।३।।

तुमच्या या साऱ्या परगतीपाई
पर्यावरणाचा तोल बिघडला लई
संग तुमच्या आपला झगडा नाई
पण अशी मनमानी ठीक नाई ।।४।।

काय सांगावं बॉ तुले तू माणूस हाय
अन् वरून लई समजदार बी हाय
चुकलं असन माहा तर माफ कर मले
असं कानात सांगून गेला भिंगोटा मले ।।५।।

65. सायकल

सायकल म्हणजे आई
समद्याच्या कामी येई
पण नाव तिचं कुठं नाई ।।१।।

जीनं घडिले मास्तर कई
जिच्या शिटीवर बसून
झाले हाफिसर कई ।।२।।

सायकलची होती संग म्हणून
आज घरापुढं हाय चारचाकी
पोरं पोरी चालवतात दुचाकी ।।३।।

मोटारगाडी करी खिशे कपाई
पेट्रोल बिगर हालत नाई
पण सायकल आई कवा रूसली नाई ।।४।।

मोठा पगार बी पुरत नाई
पेट्रोलच्या लाडापाई
ईकली सायकल आई ।।५।।

जीनं गरिबीत साथ सोडली नाई
जी कवा रूसली फुगली नाई
आज तिचं नाव बी घेत नाई ।।६।।

66. तिखट पापड

एक होते माकड
त्याने खाल्ले पापड
पापड होते तिखट
पाणी नव्हते निकट ।।१।।

माकड धावले नदी काठी
पाणी तिथले पिण्यासाठी
पण पिता येईना त्याला पाणी
आतून पहात होती जलराणी ।।२।।

जलराणी म्हणाली माकडाला
जा पपईचे पान आणायला
कर त्याच्या देठाची नळी
असते ती आतून पोकळी ।।३।।

मग हवे तेवढे पी पाणी
सांगते तुला मी जलराणी
ऐकून केली देठाची नळी
आणि हळूहळू पाणी गिळी ।।४।।

67. बगळा

बगळ्या कसा धरी तू धीर
की पाण्यात राही उभा स्थिर
न होऊ देता मन तुझे अधीर ।।१।।

तुला पाया चोचीचाचं आधार
तरी मनाने कसा कणखर
धीराने मिळवितो भाकर ।।२।।

बगळ्या देशील का तू
माणसाला तुझा धीर
मिळविण्या धीराने भाकर ।।३।।

माणूसासं श्रीमंतीची घाई
कापून खिसे करतो कमाई
माणुसकी राहिली नाही ।।४।।

उभा संसाराच्या सागरतीरी
दोन पायाचा शिकारी
स्वतःच होई शिकार
अन् मोहमाया बने शिकारी ।।५।।

68. ये - ये चिऊ माझ्या घरात

ये - ये चिऊ माझ्या घरात
अशी का तू उभी उन्हात
आपण दोघे चॉकलेट खाऊ
मग खेळायला बागेत जाऊ ।।१।।

रंगीबेरंगी फुलपाखरासंगे खेळू
बागेतली छान - छान फुले पाहू
आता नको तू मातीत न्हाऊ
चल पोहायला नदीवर जाऊ ।।२।।

शोधू नको तू इकडे तिकडे दाणा
भूक लागल्यावर माझ्या घरी येना
देईन मी तुला लोणच्याची फोड
आणि टेबलावरचा लाडू गोड ।।३।।

तू ये ना माझ्या घरात चिऊ
आपण दोघे पपई खाऊ
मग मस्त थोडा वेळ टी. व्ही. पाहू
आणायला खाऊ बाजारात जाऊ ।।४।।

69. चला मैदानी खेळ खेळू

चला मैदानी खेळ खेळू
खो - खो, कबड्डी नि लंगडी
वाटून घेऊया सगळे गडी ।।१।।

चला मैदानी खेळ खेळू
क्रिकेट, फुटबॉल नि व्हॉलीबॉल
जा धावत या घेऊनी बॉल ।।२।।

चला मैदानी खेळ खेळू
धरू नेम नि मारू बाण
फेकू भाला फेकू गोळा छान ।।३।।

चला मैदानी खेळ खेळू
खेळू हॉकी गडी - गडी
आणा दोरी मारू उडी ।।४।।

चला मैदानी खेळ खेळू
तन आणि मन सुदृढ करू
करुनी कष्ट देशा सुफलाम करू ।।५।।

70. मित्र

मित्राविन निरस हे जीवन
कोण येथे जगी मित्राविन

नाती - गोती ही फुलमाळ
मैत्री हे त्यातले कमळ
अधूरे - अधूरे सारे मित्राविन ।।१।।

मित्र हे टॉनिक जगण्याचे
पानं रंगवितात जीवनाचे
अशक्य जगणे मित्राविन ।।२।।

थेंबा थेंबाने साचतो सागर
मित्र भरतात जीवन घागर
अर्थ नसे जगण्या मित्राविन ।।३।।



71. नदी गं नदी

नदी गं नदी
वाहतेस कशी?
घेऊन आढे वेढे
धावतेस कशी? ।।१।।

नदी गं नदी
पचवून दगड धोंडे
आम्हा गोड पाणी
तू देतेस कशी? ।।३।।

नदी गं नदी
पात्र तुझे मोठे किती?
त्यात मासे लपाछुपी
खेळतात कशी? ।।३।।

नदी गं नदी
दऱ्या खोऱ्यातूनी
वाट स्वत:साठी
तू काढतेस कशी? ।।४।।

नदी गं नदी
नि:स्वार्थ करुनी सेवा
हसता खेळता
सागराला मिळतेस कशी? ।।५।।

An Imprint of KavitaSagar

9975873569, 8484986064

sunildadapatil@gmail.com

Arial Unicode 14 MS Words 7442

Dr. Sunil Dada Patil,

The Raj Bhavan, House of Books,
C/o **KavitaSagar Publishing Agency**,
215, Malbhag, Near Water Tank,
At and Post - Dharangutti -
416102, Via - Nandani, District -
Kolhapur, Maharashtra, India,
Telephone - 9975873569,
8484986064,
sunildadapatil@gmail.com



KavitaSagar Publishing Agency

9975873569, 8484986064